IIJS Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

# आशययुक्त अध्यापन पद्धी संकल्पना व महत्व

प्रा. खैरनार किरण सहादू,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक – २.

**प्रास्ताविक –**

आशययुक्त अध्यापन पद्धती ही राष्ट्रीय शिक्षक परिषदेने शिक्षक प्रशिक्षणाच्या १९७८ च्या अभ्यासक्रम चौकटीत आणलेली मूळ कल्पना होय. शिक्षक–प्रशिक्षणात 'काय शिकवायचे' यापेक्षा 'कसे शिकवायचे' यांचा विचार करण्यावर भर दिल्याने स्वाभाविकच आशयाचा विचार तुलनेने कमी होतो. तसे होता अध्यापनाचा विचार आशयासंदर्भात केला पाहीजे असा आग्रह आशययुक्त अध्यापन पद्धतीत आहे.

१९९८ च्या अभ्यासक्रम चौकटीत अध्यापनशास्त्रीय विश्लेषण हा नवीन विचार मांडण्यात आल्याने संदिग्धता निर्माण झाली. अध्यापनशास्त्रीय विश्लेषणापेक्षा आशययुक्त अध्यापन पद्धती ही व्यापक संकल्पना असून या संकल्पनेत अध्यापनशास्त्रीय विश्लेषणाचा समावेश होवू शकतो यामुळ आशययुक्त अध्यापन पद्धतीचे महत्व अधिक आहे

शिक्षक प्रशिक्षण काळात आशय आणि अध्यापन या दोन्ही स्वतंत्र विचार केला जात असे. परंतू आता आाशय आणि अध्यापन पद्धती यांचा एकत्रित विचार अधिक प्रभावी ठरत आहे. आशय म्हणजे पूर्वी आत्मसात केलेले ज्ञान पुन्हा नव्याने शिकणे नाही तर अध्यापनाच्या दृष्टीने शालेय स्तरावरील आशयाचे सखोल आकलन होयं.

शिक्षक आपले आशयज्ञान विविध स्त्रोताव्दारे करत असतो. त्यानंतर आपला शिकवण्याचा हेतू विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी, पूर्वज्ञान, अध्यापन पद्धती, परीक्षा या संदर्भात विचार करुन अध्यापन कार्यास तयार होत असतो. प्रत्यक्ष अध्यापनापूर्वी शिक्षक आपल्या आशयावर अध्यापनाच्या संदर्भात ज्या विविध प्रक्रिया करीत असतो, त्यालाच आशययुक्त अध्यापन पद्धती म्हणता येईल.

**आशययुक्त अध्यापन पद्धती अर्थ, संकल्पना व स्वरुप –**

१९७८ च्या राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेने सादर केलेल्या शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रम चौकटीत आशययुक्त ही संकल्पना प्रथम मांडली. आशययुक्त अध्यापनामध्ये आशय आणि अध्यापन यांच्यातील एकात्मीकरण, एकजिनसीपणा अपेक्षित आहे. यावरच अध्यापनाची परिणामकारकता वाढू शकते.

आशययुक्त अध्यापनात नवीन आशय किंवा उच्च पातळीवर आशय शिकविणे अपेक्षित नसून

IIJS Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

शिक्षकांनी अध्यापनासंदर्भात आशयावर करावयाच्या विचार प्रक्रियेला विशेष महत्व आहे.

एन. सी. ई. टी. ने आपल्या अहवालात Content Cum Methodology चे स्पष्टिकरण पुढीलप्रमाणे केलेले आहे. The Word Content-Method Clearly Implies that there will be a meaningul integration of the content and method in terms of observable skills developed in the student teacher. It is not any additional content or enriched content seperately provided to the trainee in his discipline. It is rather the deeper understanding of the concepts he is required to teach in the school (NCERT 1978, P.85)

'आशययुक्त अध्यापन पद्धती म्हणजे निरीक्षणक्षम कौशल्यांच्या परिभाषेत छात्र अध्यापकांमध्ये विकसित झालेले आशय आणि पद्धती यांचे अर्थपूर्ण एकात्मीकरण होय.'

आशययुक्त अध्यापन पद्धती म्हणजे विविध विद्याशाखात स्वतंत्ररित्या दिलेल्या समृद्ध किंवा अतिरिक्त आशय नसून शाळेत शिकवाव्या लागणा—या विविध संकल्पनांचे सखोल आकलन होय. यावरुन आशययुक्त अध्यापन पद्धतीची काही वैशिष्टये दिसून येतात.

१. आशययुक्त अध्यापनात आशय आणि अध्यापन या दोहोंचे अर्थपूर्ण एकात्मीकरण अपेक्षित आहे.

२. एकात्मीकरण निरीक्षणक्षम व व्यक्त वर्तनाच्या स्वरुपात असते.

३. आशययुक्त अध्यापन पद्धती म्हणजे स्वतंत्ररित्या दिलेले अतिरिक्त समृद्ध ज्ञान नव्हें.

४. शालेय स्तरावरील संकल्पनाचे सखोल आकलन होय.

थोडक्यात आशययुक्त अध्यापन पद्धतीमध्ये शिकवायावयाच्या आशयाचे सखोल आकलन, संबंधित आशयाचे अध्यापनाशी झालेले अर्थपूर्ण एकात्मीकरण यांचा समावेश होतो.

'ली शुल्मन' या अमेरिकन तज्ज्ञाने आशययुक्त अध्यापन पद्धती या संकल्पनेला अध्यापनशास्त्रीय आशयज्ञान (Pedagogical Content Knowledge) असे म्हटलेले आहे. ली शुल्मन यांच्या मते अध्यापनशास्त्रीय आशयज्ञान म्हणजे आशय आणि अध्यापन पद्धती यांचे संयोगीकरण (Amalgamation) होय.

आशय विद्यार्थ्यांपर्यंत जावून पोहोचावा यासाठी त्या आशयाचे अनुरुप अशा अध्यापन कृतीत रुपांतर करीत असतो. या रुपांतरालाच ज्ञानाची प्रतिरुपणे (Knowledge Representation) म्हटले जाते. विद्यार्थ्यांना एखादी कल्पना स्पष्टपणे आकलन व्हावी यासाठी अनेक उदाहरणे, दाखले, दृष्टांत, चित्रे, स्पष्टीकरणे, दिग्दर्शन यांचा उपयोग करीत असतो. यालाच ज्ञानाची प्रतिरुपणे म्हणून संबोधले जाते. शुल्मनच्या मते आपल्याला जो घटक शिकवायचा असेल त्याचे प्रथम स्वत: आकलन करुन तो घटक का शिकविणार आहोत हे निश्चित केल्यानंतर त्याचे ज्ञानाच्या प्रतिरुपणात रुपांतर करणे शक्य होत असते. ज्ञानाच्या

रुपांतरासाठी

१. अध्यापनासाठी जे साहित्य निवडावयाचे आहे त्याचा चिकित्सक विचार करुन निवड करणे.

२. अध्यापनाच्या मुख्य कल्पना आणि त्यासाठी योग्य अशा अध्यापन कृती योजना म्हणजेच प्रतिरुपणाचा विचार करणे.

३. समर्पक अध्यापन पद्धती.

४. विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार अध्यापनात करावयाचे बदल

शुल्यमने आशययुक्त अध्यापन पृधती संदर्भात कोणकोणत्या घटकांचा विचार करावा ते घटक खालीलप्रमाणे आहेत.

१. शिक्षकाला आवश्यक असलेले आशयज्ञान, अध्यापनशास्त्राचे ज्ञान, अभ्यासक्रमाचे ज्ञान यांच्यातील परस्परसंबंधाचा विचार.

२. शिक्षकाला आवश्यक असलेले आशयज्ञान आणि अध्यापन करतांना त्यामध्ये होणारा बदल

३. शालेय स्तरावरील विषयाचे ज्ञान आणि शिक्षकाने पदव्युत्तर पातळीवर त्या विषयाचे प्राप्त केलेले ज्ञान यांचा परस्परसंबंध

४. विद्यार्थी म्हणून विषय शिकत असतांना आणि शिक्षक म्हणून विषय शिकवित असतांना घडणा—या विविध विचार प्रक्रिया

५. शिक्षकाला माहिती असलेले ज्ञान आणि त्याच्या अध्यापनाची गुणवत्ता

६. विषयाची संरचना आणि शिक्षकाला त्याचे झालेले आकलन आणि त्या विषयाच्या आकलनावर होणारा परिणाम

७. माहिती नसलेले व माहिती असलेले आशयज्ञान शिकवितांना होणा—या शिक्षकांच्या विचार प्रक्रिया

८. विद्यार्थ्यांना सहज आकलन होण्यासाठी शिक्षकांनी आशयाचे केलेले रुपांतर

९. अनुभवी शिक्षकांच्या विचार प्रक्रियेतील फरक

१०. आशयाची व अध्यापनकृतीची निवड करतांना होणारी शिक्षकांची निर्णय प्रक्रिया

११. संबंधित घटक शिकविण्यासाठी निवडलेल्या अध्यापन कृतीचे शिक्षकांच्या मनातील उगमस्थान

वरील घटकांच्या स्वरुपावरुन —

१. आशयासंबंध्धी शिक्षकांच्या विचारप्रक्रिया

२. विषय शिकविण्यासाठी शिक्षकांनी निवडलेली अध्यापन कृती

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

३. शिक्षकांची आशयज्ञान समृद्धता

४. आशयज्ञानाच्या संदर्भात विद्यार्थी विचारप्रक्रियेचा विचार व चार गटांमध्ये वर्गीकरण करता येईल.

शुल्मनने मांडलेल्या अध्यापनशास्त्रीय आशयज्ञानाच्या विचारावरुन महत्वपूर्ण मार्गदर्शक तत्वे प्राप्त होतात ती खालीलप्रमाणे आहेत.

१. अध्यापकाच्या विषयज्ञानात आपोआप बदल होत नसून त्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात.

२. विषयज्ञानास बळकटी मिळते.

३. अध्यापकाला आपल्या विषयाकडे पाहण्याच्या दृष्टीत बदल करता येतात.

४. शिकविण्यापूर्वी संबंधित घटकांचे ज्ञान असणे आवश्यक असून ते स्वत: प्राप्त करावे.

५. आशयाच्या संदर्भात अध्यापन पद्धती आत्मसात करतांना पाय–या माहिती असाव्यात.

**आशययुक्त अध्यापन पद्धतीचे महत्व –**

बी. एड्. अभ्यासक्रमात आशययुक्त अध्यापन पद्धती समाविष्टि केलेली असून तिची उदिद्ष्टये पुढील प्रमाणे आहेत.

१. आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या अभ्यासामुळे विषयचे स्वरुप व संरचना यांचे आकलन होवू शकते.

२. अध्यापनामध्ये अभ्यासक्रम, पाठयक्रम, पाठयपुस्तक यांच्या अभ्यासाचे महत्व सांगता येते.

३. आशययुक्त अध्यापन पद्धतीमुळे आशयज्ञान अभिवृद्धीबाबत माहिती प्राप्त करता येते.

४. अध्यापन घटकांचे आशयविश्लेषण करता येते.

५. अध्यापन आशयानुसार अध्यापन पद्धती व कौशल्ये निवडता येतात.

६. ज्ञानाच्या प्रतिरुपणांचा विचार करता येतो.

७. आशययुक्त अध्यापन पद्धतीसंदर्भात स्वत:चे व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करता येते.

आशययुक्त अध्यापन पद्धतीने ज्ञानदान परिणामकारक होण्यात मदत होईल, जे जरी खरे असले तरी इतर घटकांमुळे शिक्षकाला प्रत्येक अध्यापन मुद्यांचा सविस्तर असणारा प्रत्येक शिक्षक त्याचा परिणामकारकतेने वावर करु शकेलच असे नाही. यासाठी शिक्षकांचे प्रयत्न त्याचे प्रशिक्षण चिकाटी व कष्ट करावयाची तयारी असायला हवी. अध्यापनाच्या प्रत्येक घटकाकडे चिकित्सक दृष्टिने पाहता आले पाहिजे. त्यामुळे आशययुक्त अध्यापन पद्धतीद्वारे अध्यापनाची परिणामकारकता वाढण्यास मदत होईल.

**आशययुक्त अध्यापन पद्धतीचे महत्व खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल –**

१. **निरीक्षणक्षम कौशल्ये –** आशययुक्त अध्यापन पद्धतीद्वारा प्रशिक्षणार्थी यांच्या अध्यापन वर्तनात

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

बदल घडतो. हा बदल मुख्यत्वे आशय व अध्यापनाचे अर्थपूर्ण एकात्मीकरणाच्या बाबत असेल हा बदल त्यांच्या अध्यापन वर्तनातून दिसून यावा म्हणजेच त्याचे निरीक्षण करता यावे.

आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थी यांच्यामध्ये आशय व अध्यापनाबाबत बौध्दिक कौशल्य विकसित होण्यात मदत होते. आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थी यांच्यामध्ये अध्यापनासाठी आवश्यक क्रिया कौशल्ये विकसित होतात. यामध्ये शाब्दिक कौशल्यात प्रश्न विचारणे, श्रवण वाचन, स्पष्टीकरण, तर अशाब्दिक कौशल्यामध्ये फलक लेखन, आवश्यक हालचाल, शैक्षणिक साधनांचा वापर यांचा समावेश होतो.

मानवी संबंध निर्माण करण्यास सहायीभूत ठरणारी क्रिया कौशल्ये विकसित होण्यास मदत होते. शिक्षक व विद्यार्थी यामध्ये आंतरक्रिया होवून परस्परांबद्दल सहकार्य, आदर, निर्माण होवून सकारात्मक वातावरण निर्माण होते.

२. **आशय** – आशययुक्त अध्यापन पद्धतीद्वारे आशयाचे विश्लेषण करता येते. आशयामधील तत्वे, तथ्ये, नियम, सिध्दांन्त, संज्ञा, सूत्रे, संकल्पना यांची मांडणी लक्षात येते.

३. **अध्यापन पद्धती** – अध्यापन पद्धतीची निवड करतांना विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, बौद्धिक क्षमता, अभिरुची, उपलब्ध साधनसामुग्री यांचा विचार करुन विविध अध्यापन पद्धतीपैकी कोणती पद्धती उदिद्ष्ट साध्य करण्यासाठी समर्पक अहे या संदर्भातील दृष्टीकोन प्राप्त होतो.

४. **आशय व अध्यापन पद्धतीचे अर्थपूर्ण एकात्मीकरण** – आशय, अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन यांचा एकत्रितरित्या विचार अर्थपूर्ण एकात्मीकरण साधण्यासाठी आवश्यक ठरतो. आशययुक्त अध्यापन पद्धतीमुळे अर्थपूर्ण एकात्मीकरण घडल्याने विद्यार्थ्यांच्या वर्तनात विकासाची ज्ञानात्मक, भावात्मक, क्रियात्मक कौशल्याची क्षेत्रे विकसित होण्यास मदत होईल म्हणून शिक्षक व शालेय विद्यार्थी या दोहोंच्या दृष्टीने आशययुक्त अध्यापन पद्धती महत्वाची आहे.

थोडक्यात आशययुक्त अध्यापन पद्धतीमुळे अध्यापनाला शास्त्रशुद्धता प्राप्त होईल, ज्ञानाची शास्त्रीय बैठक निर्माण होईल, अध्यापनाचा मूळ हेतू साध्य होईल, आशयाचे विश्लेषण, वर्गीकरण, विशदीकरण करता येईल मिळविलेल्या ज्ञानाचे उपयोजन करता येईल, आशयज्ञानातून नवनिर्मिती करुन सामान्यीकरण तत्वे, नियम, सिध्दांन्त तयार करता येईल.

आशययुक्त अध्यापन पद्धती ही संकल्पना नवी असली तरी या अंतर्गत येणा—या संकल्पना नवीन नाही त्याकडे बघण्याची दृष्टी मात्र नवीन आहे. आशययुक्त अध्यापन पद्धतीमुळे शिक्षक, अभ्यासक्रमाची चिकित्सा, आशय विश्लेषण करुन शालेय अध्यापन पद्धती, अध्यापन तंत्रे, अध्यापन कौशल्ये याचा

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

अध्यापनात वापर करुन आशयाला अधिक न्याय देण्याचा प्रयत्न करतील म्हणून आशययुक्त अध्यापन पद्धतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ –**

१. कुंडले म. बा. (१९९४) अध्यापनशास्त्र व पद्धती, पुणे : व्हीनस प्रकाशन

२. जोशी अनंत, साळूंके कविता (१९९९) आशययुक्त अध्यापन पद्धती, नाशिक : य.च.म.मु.वि.

३. महाजन के. एम. (१९२०) आशयासहित अध्यापन पद्धती, गणित प्रथमावृत्ती, जळगाव : व्यंकटेश प्रकाशन

४. वाजे सुर्यभान व बरकले रामदास (२००२) इतिहासाचे अध्यापनशास्त्रीय विश्लेषण, व्दितीय आवृत्ती, नाशिक : आदित्य प्रकाशन

६. बोरसे चंद्रकांत (२००६) विज्ञान आशययुक्त अध्यापन पद्धती आणि अध्यापनशास्त्रीय विश्लेषण, व्दितीय आवृत्ती, नाशिक : नेहा प्रकाशन

७. साळुंके कविता (२००३) आशययुक्त अध्यापन पद्धती, नाशिक : य.च.म.मु.वि.

८. Kochar S.K. (1967) Teaching of History Delhi : Sterling Publishers

९. Thorndke R.L. (1967) Measurement and Evaluation in Psychology and Education New Delhi : Wiley Rastorn Private Limited